GODA FARM



# शेतीमाल मूल्य साखळीत गोदा फार्मचा ठसा



माणिक रासवे

**शेतीमालाची मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथील गोदावरी व्हॅली फार्मर्स प्रोड्यूसर्स कंपनी लि. (गोदा फार्म) प्रयत्नशील आहे. कंपनीने सोयाबीन, हरभरा, तूर आणि हळद या प्रमुख नगदी पिकांवर लक्ष केंद्रित केले. हळद पावडर, फुटाणे या प्रक्रिया उत्पादनांची निर्मिती आणि हळद पावडरची निर्यात या माध्यमातून कंपनीने आपली कक्षा विस्तारली आहे. शेतकऱ्यांचा विश्वास कमावलेली गोदा फार्म ही मॉडेल शेतकरी उत्पादक कंपनी म्हणून नावारुपाला आली आहे.**



टीम गोदा फार्म.

शेतीमालाची मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथील गोदावरी व्हॅली फार्मर्स प्रोड्युसर्स कंपनी लि. (गोदा फार्म) प्रयत्नशील आहे. कंपनीने सोयाबीन, हरभरा, तूर आणि हळद या प्रमुख नगदी पिकांवर लक्ष केंद्रित केले. हळद पावडर, फुटाणे या प्रक्रिया उत्पादनांची निर्मिती आणि हळद पावडरची निर्यात या माध्यमातून कंपनीने आपली कक्षा विस्तारली आहे. गेल्या चार वर्षांत गोदा फार्मशी तालुक्यातील तसेच बाहेरील शेकडो शेतकरी जोडले गेले आहेत. कंपनीची विविध ठिकाणी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांचा विश्वास कमावलेली गोदा फार्म ही मॉडेल शेतकरी उत्पादक कंपनी म्हणून नावारुपाला आली आहे.

मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच हिंगोली जिल्ह्यातही बहुतांश क्षेत्र कोरडवाहू आहे. शेतकऱ्यांची सारी भिस्त खरिपातील सोयाबीन, तूर आणि रब्बीतील हरभरा या पिकांवर आहे. हंगामी सिंचनाची सोय असलेले शेतकरी हळदीचे उत्पादन घेतात. गेल्या पाच-सहा वर्षांत महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झाल्या.

तालुक्यातील भूमिपुत्र तसेच प्रशासकीय सेवेतील अधिकारी संजय काटकर यांनी शेतमाल विपणन व्यवस्थेत शेतकऱ्यांच्या एकजुटीचे महत्त्व समजावून सांगितले. त्याचा परिमाण म्हणून शेतकरी एकत्र आले. कळमनुरी येथे २६ ऑगस्ट २०१६ रोजी गोदावरी व्हॅली फार्मर्स प्रोड्युसर्स कंपनी लि.(गोदा फार्म) ही जिल्ह्यातील पहिली विना अनुदानित शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन झाली. अर्थात नाशिक जिल्ह्यातील सह्याद्री फार्म्स कंपनीचे प्रमुख विलास शिंदे यांची प्रेरणा यामागे आहे. गोदा फार्मच्या सुरुवातीच्या संचालक मंडळामध्ये नितीन चव्हाण, माधवराव चौतमल, रमेशराव पाटील, गोविंद डिके पाटील, सूर्याजी शिंदे, गंगाधर शृंगारे, सुरेश देशमुख, चंद्रकांत कुळकर्णी आदींचा समावेश होता. तालुक्यातील शेतकऱ्यांनी मिळून एकूण ५० लाख रुपये भांडवल जमा केले. कळमनुरी शहराच्या बाहेर हिंगोली रस्त्यावर महासंघाचा १७ हजार चौरस फुटाचे गोदाम भाड्याने घेऊन त्या ठिकाणी कंपनीचे कार्यालय सुरु करण्यात आले. त्यावेळी कळमनुरी तालुक्यातील ५२ गावांतील ३३०० शेतकरी गोदा फार्मचे सहयोगी सभासद होते. पिकाला चांगला दर मिळावा यासाठी शेतीमालाची स्वच्छता व प्रतवारी करुन विक्री करण्यावर कंपनीने लक्ष केंद्रीत केले. सध्या नितीन चव्हाण हे गोदा फार्मचे व्यवस्थापकीय संचालक आहेत.

## हळद पावडर निर्यात

राज्यातील प्रमुख हळद क्लस्टर म्हणून हिंगोली जिल्ह्याची ओळख आहे. कळमनुरी तालुक्यात दरवर्षी सरासरी चार ते साडे चार हजार हेक्टरवर हळद लागवड केली जाते. गोदा फार्मने कळमनुरी येथे हळद खरेदी केंद्र आणि ग्रेडिंग युनिट सुरु केल्यामुळे शेतकऱ्यांना वसमत आणि हिंगोली येथील हळद मार्केटप्रमाणे दर मिळत आहेत. शिवाय वाहतूक खर्चात बचत होते. ग्रेडिंग युनिटमध्ये चार प्रकारच्या ग्रेडमध्ये हळदीची प्रतवारी केली जाते. त्यानंतर डबल पॉलिश केले जाते. ग्रेडिंगमुळे मसाला उद्योगांना आवश्यक त्या प्रतीची हळद उपलब्ध होते. डबल पॉलिशिंगमुळे हळकुंडांना चकाकी येते. हळद ५० किलोच्या पोत्यामध्ये भरून खरेदीदाराकडे पोच केली जाते. गेल्या दोन वर्षांपासून कंपनी हळद पावडर तयार करत आहे. गोदा फार्म या ब्रॅण्डने २५० व ५०० ग्रॅमचे पॅकिंग केले जाते. वर्षाकाठी सुमारे १०० टन हळद पावडरची निर्यात होते. याशिवाय राज्याच्या विविध भागांसह गुजरात व इतर राज्यांत हळद पावडरची विक्री होते.

## एनसीडीईएक्सतर्फे सन्मान

नॅशनल कमोडिटी डेरिव्हेटिव्ह एक्सेंजचे (एनसीडीईएक्स) वसमत येथे गोदाम आहेत. एनसीडीईएक्स विविध निकषांनुसार गुणवत्तापूर्ण हळदीची खरेदी करते. बाजारातील दरापेक्षा पाच ते दहा टक्के अधिक फायदा होतो. एनसीडीईएक्सच्या प्लॅटफॉर्मवर मूल्यवर्धित हळदीची विक्री केली. या सगळ्या प्रक्रियेत गोदा फार्मचा सहभाग महत्वपूर्ण ठरला आहे. याबद्दल एनसीडीईएक्सतर्फे गोदा फार्मला २०१७ मध्ये कृषी प्रगती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पदार्पणातच हा पुरस्कार मिळवणारी गोदा फार्म ही मराठवाड्यातील एकमेव शेतकरी उत्पादक कंपनी ठरली.

## सोयाबीन विक्री

शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या सोयाबीनची स्वच्छता व प्रतवारी करुन थेट ऑईल मिलला विक्री केली जाते. त्यासाठी लातूरसह प्रमुख ठिकाणच्या तेल उद्योजकांशी करार केले जातात. त्यामुळे शेतकऱ्यांना तुलनेने अधिक दर मिळतो. यंदा दोन हजार क्विंटल सोयाबीनची खरेदी करण्यात आली आहे.

## हरभरा पॅकिंग, प्रक्रिया

हरभरा हे रब्बी हंगामातील प्रमुख नगदी पीक आहे. कंपनीच्या स्थापनेपासून हरभरा खरेदी केली जाते. गेल्या दोन वर्षांपासून हरभऱ्याचे फुटाणे तयार करून गोदा फार्म या ब्रॅन्डने विविध ठिकाणी विक्री केली जात आहे. त्यामुळे मूल्यवर्धन होऊन हरभऱ्याला तुलनेने अधिक दर मिळत आहेत. हरभरा बियाण्यांची ३० किलो वजनाच्या पिशव्यांमध्ये पॅकिंग करुन विक्री केली जाते. मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांतही हरभऱ्याला मागणी आहे.

## आधारभूत खरेदी

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत गोदा फार्मतर्फे सोयाबीन, तूर, हरभरा आदी शेतीमालाची खरेदी केली जाते. पहिल्या वर्षी प्रति क्विंटल ३० रुपये याप्रमाणे लाभांशांचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले. यंदा आजवर दोन हजार क्विंटल हरभऱ्याची खरेदी करण्यात आली आहे.

## फार्मर्स फॅसिलिटी सेंटर

कंपनीच्या गोदामामध्ये एका बाजूला शेतीमाल खरेदी केंद्र तर दुसऱ्या बाजूला फार्मर्स फॅसिलीटी सेंटर सुरु करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना बि- बियाणे, खते, किटकनाशके, ठिबक, तुषार संच, पीव्हीसी पाईप, रोपवाटिकेसाठी कोकोपीट, कोकोपीट ट्रे, फवारणी पंप आदी शेती उपयोगी साहित्य बाजारातील दरांपेक्षा स्वस्तात उपलब्ध करुन दिले जाते.

## तंत्रज्ञानाचा प्रसार

शेतकऱ्यांपर्यंत सोयाबीन, तूर, हरभरा, हळद या पिकांच्या लागवड, व्यवस्थापन, काढणीचे आधुनिक तंत्रज्ञान पोचविण्यासाठी गोदा फार्मतर्फे दरवर्षी खरीप तसेच रब्बी हंगाम पूर्व शेतकरी मेळावे आयोजित केले जातात. रब्बी मेळाव्यात सोयाबीन विक्रीचे करार केले जातात.

## २५ हजारांवर शेतकरी जोडले

शेतीमाल खरेदी- विक्रीच्या व्यवहारांतील पारदर्शकता, वेळेवर पेमेंट (चेक किंवा आरटीजीएस), कटतीवर काट आणि तुलनेने चांगला दर यामुळे गेल्या पाच वर्षांत तालुक्यातील १२६ गावांतील २५ हजारांवर शेतकरी गोदा फार्मशी जोडले गेले आहेत. सोयाबीन, तूर, हरभरा आणि हळद मिळून सुमारे पाच लाख क्विंटल शेतीमालाच्या व्यवहाराचा वार्षिक टप्पा कंपनीने गाठला आहे. उलाढाल वाढल्यामुळे जुनी जागा अपुरी पडू लागली. त्यामुळे कंपनीने कळमनुरी-नांदेड रस्त्यावरील एमआयडीसी वसाहतीमध्ये ४० हजार चौरस फुट जागेत गोदामाची उभारणी केली आहे. तेथे सोयाबीन, तूर, हरभरा खरेदी केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. या ठिकाणी प्रतिदिन १० हजार क्विंटल शेतीमालाची हाताळणी करता येते. याशिवाय स्वच्छता, प्रतवारी करण्याची सुविधा देखील या ठिकाणी आहे.

## रोजगारनिर्मिती

गेल्या पाच वर्षांत गोदा फार्मने दीडशे ते दोनशे व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली आहे. यामध्ये अधिकारी, कर्मचारी, कामगारांचा समावेश आहे. गतवर्षीच्या लॉकडाऊनमध्ये इतरत्र नोकर कपात केली जात असताना गोदा फार्मने मात्र अनेक पदांची भरती केली हे विशेष. अप्रत्यक्षरित्याही अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

## विविध ठिकाणी विस्तार

कंपनीने कळमनुरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी विश्वासर्हता कमावली आहे. अन्य जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचाही प्रतिसाद वाढत आहे. त्यामुळे कंपनीने आखाडा बाळापूर (ता. कळमनुरी), सिरसम (ता. हिंगोली), नांदेड, औरंगाबाद ,वाशिम, मनोरा, उमरखेड या ठिकाणी केंद्र सुरू केले आहेत. औरंगाबाद येथे कंपनीकडून नाफेडतर्फे कांदा आणि मका खरेदी केली जाते. अन्य ठिकाणी सोयाबीन, तूर, हरभरा या शेतीमालाची खरेदी होते.

– **बालाजी मोरे**, जनसंपर्क अधिकारी, गोदा फार्म,
७४४७७५८३०९



सोयाबीन स्वच्छता व प्रतवारी युनिट.

# हरभरा मार्केट रिपोर्ट

(गोदावरी व्हॅली फार्मर्स प्रोड्यूसर कंपनीकृत बाजार साक्षरता अभियान)

मासिक रिपोर्ट क्र. - १८, ता. १ एप्रिल २०२१

(खाजगी वितरणासाठी)


# नियंत्रित उत्पादनामुळे बाजारभावास भक्कम आधार

देशांतर्गत मागणीच्या तुलनेत संतुलित पुरवठा तसेच 'नाफेड'कडील मोठ्या खरेदीमुळे यंदा हरभरा बाजारभावास भक्कम आधार आहे. जानेवारी ते मार्च या तिमाहीत तापमानवाढ आणि अवकाळी पाऊसमानामुळे काही ठिकाणी उत्पादन बाधित झाले आहे. यंदा एकूण उत्पादन (संख्यात्मक) आकारमानाच्या तुलनेत गुणात्मक (क्वालिटी) मालाचा पुरवठा मर्यादित राहील असे दिसते. यामुळे यंदाही ठराविक कालावधीत बाजारात किफायती भाव पातळी दिसू शकते. बाजार समिती पातळीवर ४८०० रुपये प्रतिक्विंटल ही आधारपातळी (सपोर्ट लेव्हल) म्हणून अपेक्षित आहे.

## फ्युचर्स मार्केट विश्लेषण

एनसीडीईएक्स एप्रिल हरभरा वायदा बुधवारी (ता.३१) मार्च रोजी ५०८० रुपये प्रतिक्विंटलला क्लोज झाला. मे वायदा ५१२८, तर जून वायदा ५१७१ रुपये प्रतिक्विंटलला क्लोज झाले. बुधवारी सर्व वायद्यांत एक टक्क्याच्या आसपास घट होती. मागील तिमाहीत एप्रिल वायद्यात प्रतिक्विंटलमागे ५०० रुपयांची वाढ झाली आहे. डिसेंबर महिन्यात ४५०० रुपये प्रतिक्विंटलच्या लोअर पातळ्यांपासून मार्चअखेरपर्यंत १२ टक्क्यांनी वायद्या सुधारणा झाली.

मागील तिमाहीत म्हणजे, जानेवारी ते मार्च २०२१ या कालावधीत वायदे बाजारात सुधारणा होण्याची



प्रमुख तीन कारणे होते, १. बाजारभाव विषयक मुलभूत परिस्थितीनुसार (मार्केट फंडामेंटल्स) ४५०० रुपये प्रतिक्विंटल ही पातळी स्टॉकसाठी आकर्षक होती. २. सक्रांतनंतर थंडी कमी असणे आणि पुढे अवकाळी पावसामुळे काही ठिकाणी उत्पादनात घट आणि गुणवत्ता खराब होण्यामुळे बाजारात सुधारणेला चालना मिळाली. ३. ५१०० रुपये प्रतिक्विंटल या रेट्सला आधारभावाअंतर्गत नाफेडकडील शासकीय खरेदीच्या आधारामुळे मार्केट सेंटिमेंट सकारात्मक होणे.

यापुढील काळात शेतकऱ्यांकडील आवेकचा कल, नाफेडकडील खरेदीचा वेग आणि मधल्या काळात अवकाळी पावसामुळे नुकसानीच्या नेमक्या अनुमानानुसार बाजाराची चाल ठरेल. आजघडीच्या मुलभूत परिस्थितीनुसार ४८०० हजाराच्या आसपास बाजारभावास भक्कम आधार आहे.

## देशांतर्गत आवकेचा कल

सरकारी आकडेवारीनुसार फेब्रुवारी महिन्यात देशात २ लाख ७ हजार टन हरभरा आवक झाली. त्या तुलनेत मार्चमध्ये ६.३ लाख टन आवक झाली. मार्चमध्ये दोनशे टक्क्यांनी आवक वाढली. सिजनल प्रेशरमुळे आवकेत सुधारणा दिसली आहे. गेल्या वर्षी मार्च महिन्यात केवळ २.१५ लाख टन आवक होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत किफायती बाजारभाव आणि लवकर पेरण्यांमुळे यंदा आवकेत सुधारणा आहे.

मार्च २०२१ मध्ये प्रमुख राज्यांत झालेली राज्यनिहाय हरभरा आवक पुढीलप्रमाणे :

| राज्य | आवक (लाख टन) |
|---|---|
| गुजरात | १.१ |
| मध्यप्रदेश | १.९ |
| महाराष्ट्र | १.४ |
| राजस्थान | १.१ |
| एकूण देश | ६.३ |

## नाफेड खरेदीचे उदिष्ट वाढले :

प्राईस सपोर्ट स्किम (झडड) अंतर्गत नाफेड चालू हंगामात ३२.६ लाख टन हरभरा खरेदी करणार आहे. प्रमुख उत्पादक राज्यनिहाय खरेदीचे उदिष्ट असे आहे. मध्यप्रदेश १४.५ लाख टन, महाराष्ट्र ६.१७ लाख टन, राजस्थान २ लाख टन. एकूण उत्पादनाच्या सुमारे ३० टक्क्यापर्यंत नाफेड खरेदी करणार आहे. गेल्या वर्षी २१.२ लाख टनापर्यंत खरेदी झाली होती.

वरील योजनेअंतर्गत ता. २९ मार्चपर्यंत १ लाख ८ हजार ३७४ टन हरभरा खरेदी झाला आहे. त्याचे एकूण मूल्य ५५.२ कोटी असून, लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या ८४ हजार ३६७ आहे.

यातील राज्यनिहाय खरेदी टनामध्ये पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| महाराष्ट्र | ५४१००.०३ |
| गुजरात | ४१,७४०.४५ |
| कर्नाटक | ७०२८.१५ |
| तेलंगणा | १८३७.४० |
| मध्यप्रदेश | ८८.७५ |

## उत्पादन अनुमानांत मोठे अंतर

केंद्रीय कृषी मंत्रालयाकडील 'सेकंड ॲडव्हान्स एस्टिमेट रिपोर्ट'मध्ये देशात ११६ लाख टन हरभरा उत्पादनाचे अनुमान दिले आहे. तथापि, विविध व्यापारी व प्रक्रियादार संस्थांच्या पाहणीनुसार केवळ ९६ लाख टन उत्पादन झाल्याचे म्हटले आहे. सरकारी आणि खासगी उत्पादन अनुमान पाहणीत तब्बल २० लाख टनाचे अंतर आहे. एकूण देशांतर्गत मागणीच्या उत्पादन अतिरिक्त नाही. मासिक सुमारे ८ लाख टन हरभऱ्याचा खप गृहीत धरता ९६ लाख टनाचा पुरवठा संतुलित स्वरूपाचा आहे. तथापि, सरकारी अनुमान प्रमाण मानले तर मागणीच्या तुलनेत अतिरिक्त पुरवठा दिसतो. आजवरचा अनुभव पाहता खासगी उत्पादन अनुमान बाजारभावासंदर्भात जास्त सुसंगत असल्याचे समोर आले आहे.

## आयात धोरणे आणि परिणाम

केंद्र सरकारच्या दुसऱ्या आगाप उत्पादन पाहणीनुसार देशात २४४ लाख टन कडधान्य उत्पादन अनुमानित आहे. देशांतर्गत गरज २७० ते २८० लाख टनादरम्यान आहे. केंद्र सरकारच्या उत्पादन अनुमानाबाबत खासगी संस्था व प्रक्रियादार असहमत आहेत. त्यांचे मते नैसर्गिक प्रतिकुलतेमुळे उपरोक्त उत्पादन अनुमानात लक्षणीय घट आहे. खासकरून तूर, उडीद आणि मूगाच्या देशांतर्गत मागणीच्या तुलनेत उत्पादन १० ते २० टक्क्यांनी कमी आहे. वरील पार्श्वभूमीवर, संबंधित संघटनांकडून तूर, मूगाचा आयात कोटा लवकर मंजूर करण्याची मागणी झाली होती.

दरम्यान, केंद्र सरकारने येत्या आर्थिक वर्षांसाठी चार लाख टन तूर व उडिदाच्या आयात कोट्यास मंजूरी दिली. तूर आयात कोटा मंजूर झाल्यानंतर बाजारात फार मोठे चढ-उतार दिसले नाहीत. वाणिज्य मंत्रालयाने ता. १९ रोजी जारी केलेल्या नोटिफिकेशनुसार - आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी ४ लाख टन तूर आणि १.५ लाख टन मुगाच्या आयात कोट्याला मंजूरी प्राप्त झालीय. मिलर्स, रिफायनरीज, ट्रेडर्स यांना मंजूर आयात कोट्याचे वाटप केले जाईल. मोझाम्बिक - भारत सरकार करारानुसार दोन लाख टन तूर कोटा वरील चार लाख टन कोट्याशिवाय आयात केला जाईल. म्हणजे एकूण सहा लाख टन तूर आयात होणार आहे.

**पूर्व आफ्रिकेतून ऑगस्ट - सप्टेंबरदरम्यान तूरीची मोठी आवक मिळते.**

| तूर | (२०-२१). |
|---|---|
| क्षेत्र | ४८.२ हेक्टर |
| उत्पादन | ३८ लाख टन |
| हेक्टरी उत्पादकता | ७.८ क्विंटल. |

चालू वर्षासाठी ६ लाख टन तूर आयात होऊ शकते. यातील दोन लाख टन तूरीसाठी मोझाम्बिक सरकार बरोबर करार झाला आहे. प्रक्रियादारांचे म्हणणे असे, की पूर्व आफ्रिका आणि मान्यमारमध्ये तुरीची उपलब्धता आहे. मान्यमारमध्ये यंदा उत्पादन कमी असून, केवळ एक लाख टन तूर आयात होवू शकते. शिवाय, मान्यमारमधील देशांतर्गत तणावामुळेही आयात उपलब्धतेबाबत प्रश्नचिन्ह आहेत.

मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये कोटा जाहीर झाला. पण आंतरराष्ट्रीय बाजारात उपलब्धता नव्हती. त्यामुळे अंदाजे ५० ते ६० हजार टनादरम्यान आयात झाली असावी. म्हणून यंदा, गेल्या वर्षी उपयोगात न आलेला आणि यंदाची आवश्यकता मिळून कोटा जाहीर करण्यात यावा, अशी प्रक्रियादारांची मागणी होती. फेब्रुवारी मार्च दरम्यान जागतिक बाजारात मुगाची उपलब्धता असते.

भारतसोडून जगातील प्रमुख तूर उत्पादक देश : (आकडे लाख टनात) मान्यमार (६.७), मलावी (४.३), टांझानिया (३.१), हैती (०.८)

वर्षारंभी नाफेडकडे १.३ लाख टन तूर साठा होता. त्यातील ७० हजार टन जानेवारी विकला. ६० हजार टन स्टॉक शिलकीत होता.

**Pulses Output** (in million tonnes)

| | 2020-21 (2nd Adv Est.) | 2019-20 | 2018-19 | 2017-18 | 2016-17 |
|---|---|---|---|---|---|
| Tur | 3.88 | 3.89 | 3.32 | 4.29 | 4.87 |
| Gram | 11.62 | 11.08 | 9.94 | 11.38 | 9.38 |
| Urad | 2.45 | 2.08 | 3.06 | 3.49 | 2.83 |
| Moong | 2.62 | 2.51 | 2.46 | 2.02 | 2.17 |
| Lentil | 1.35 | 1.1 | 1.23 | 1.62 | 1.22 |
| **Total*** | **24.42** | **23.03** | **22.08** | **25.42** | **23.13** |

Source: Agriculture Ministry, *Includes other varieties

## Insights: महत्त्वाची नोंद :


भारतात कडधान्यांची मागणी दरवर्षी दहा लाख टनाने वाढत आहे. वाढती लोकसंख्या आणि बदलती जीवनशैली प्रमुख कारण आहे.

## रिपोर्टसाठीचे माहिती स्रोत

- ऑल इंडिया दालमिल असोसिएशन
- ॲग्रीकल्चर मार्केटिंग बोर्ड, महाराष्ट्र
- महाराष्ट्र कृषी खाते
- 'डीजीएफटी' (वाणिज्य मंत्रालयअंतर्गत)
- बेसन मिल्स
- अपेडा
- एनसीडीईएक्स
- केंद्रीय कृषिमंत्रालयाचे अन्नधान्यविषयक दुसरे आगाप अनुमान
- नाफेड
- खासगी व सरकारी वृत्तसंस्था
- ॲगमार्कनेट

Report by : Deepak Chavan

## मार्च मासिक रिपोर्टमधील महत्त्वाच्या नोंदी (Inshigts)



देशांतर्गत मागणीविषयक चित्र : देशात दरमहा आठ लाख टनापर्यंत मागणी नोंदवली जाते. सणासुदीत सरासरीच्या तुलनेत वाढ असते, तर ऑफसिजनमध्ये – उपवासाच्या सणांत मागणी घटते. वाटाण्यावरील आय़ातनिर्बंध ही बाब भारतीय हरभऱ्यासाठी इष्टापत्ती ठरली आहे. डाळींच्या बास्केटमध्ये सध्या हरभरा सर्वाधिक स्वस्त आहे. ज्या प्रमाणे तूर आणि उडिदाच्या मागणीत वाढ आहे, तशी वाढ हरभऱ्यातही दिसू शकते, असे डाळ प्रक्रियादारांचे म्हणणे आहे.

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन करावे लागले तर हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि केटरिंग (होरेका) क्षेत्राकडील मागणी घटेल. तथापि, घरगुती मागणीत मात्र सातत्य राहते. किंबहुना, लोक घरी राहत असल्याने डाळवर्गीय पदार्थांचा खप वाढतो, अशी निरीक्षणे गेल्या वर्षीच्या लॉकडाऊनमध्ये समोर आली आहेत.



## आंतरराष्ट्रीय चित्र :
## ऑस्ट्रेलियात हरभरा उत्पादन दुपटीवर

सलग दुसऱ्या वर्षी देशांतर्गत गरज भागवेल एवढे हरभऱ्याचे उत्पादन अनुमानित आहे. त्यामुळे भारत सरकारकडून टीआरक्यू कोटा किंवा कस्टम ड्युटीत फेरबदल केले जाणार नाहीत. यामुळे सर्वांत जास्त अडचण ही ऑस्ट्रेलियासारख्या निर्यातदार देशांची होईल.

'ऑस्ट्रेलियन ब्युरो ऑफ ॲग्रीकल्चर'कडील रिपोर्टनुसार २०२० मध्ये ऑस्ट्रेलियात ७.५ लाख टन हरभरा उत्पादन अनुमानित आहे. २०१९ मध्ये २.८ लाख टन उत्पादनाच्या तुलनेत २०२० मधील उत्पादन १६७ टक्क्यांनी वाढले आहे. ऑस्ट्रेलियात भारतीय देशी वाणाचा हरभरा पिकवला जातो.

डिसेंबर महिन्यात ऑस्ट्रेलियाने १ लाख १३ हजार टन हरभरा निर्यात केला. यात जास्तकरून पाकिस्तानकडून खरेदी झाल्याचे कळते. रशियातून भारतात डिसेंबरमध्ये १३.८ हजार टन हरभरा आयात झाला आहे. या दरम्यान, २०१९ मध्ये ३ लाख २८ हजार टनाच्या तुलनेत डिसेंबर २०२० अखेर कॅनडात ४ लाख ८ हजार टन कॅरिओव्हर होता.

### आयात घटतेय :

**चालू आर्थिक वर्षांत एप्रिल ते जानेवारी या कालावधीत २० लाख टन कडधान्य आयात झालीय. गेल्या संपूर्ण आर्थिक वर्षांत २६ लाख टन आयात झाली होती. १६-१७ मध्ये उच्चांकी ६० लाख टन कडधान्ये आयात झाली होती. तेव्हापासून देशांतर्गत उत्पादनात सुधारणा होत गेल्याने आयातीचा आलेख उतरता राहीला आहे.**